आतील पानात वाचा...



नमस्कार माझा सदगुरु रामदासा...

दैनिक

मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध

# अक्षराज

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

जी इच्छा मनातून आणि शुद्ध अंतकरणातून
निघत असते व जे खूप तीव्र देखील असते,
त्यात खूपच जास्ती
सकारात्मक ऊर्जा समाविष्ट असते...


● वर्ष ०३ रे ● अंक १११ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये | ठाणे, बुधवार, दि.११ फेब्रुवारी २०२६ | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

● YEAR : 03 ● ISSUE : 111 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 | THANE, Wednesday, 11 February 2026 | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023


# मुंबईत भर दिवसा गोळीबाराचा थरार, १९ वर्षीय तरुणीचा मृत्यू !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** महाराष्ट्राची राजधानी आज गोळीबाराच्या घटनेने हादरली आहे. मुंबईत गोवंडी येथे शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत भर दिवसा गोळीबाराची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

या घटनेत एका १९ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला आहे. गोळीबाराच्या घटनेनंतर हल्ला करणारी व्यक्ती पळून गेली आहे. तर दुसरीकडे घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी या घटनेचा तातडीने तपास सुरु केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी दोन संशयितांना ताब्यात घेतल्याची देखील माहिती समोर येत आहे. मुंबई सारख्या मोठ्या शहरात अशा प्रकारची गोळीबाराची घटना घडल्याने अनेकांकडून आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. पण मुंबईत गोळीबाराच्या घटना सातत्याने समोर येत आहे.





नुकतंच काही दिवसांपूर्वी बॉलिवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी याच्या घराबाहेर गोळीबार झाला होता. अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर गोळीबाराची घटना याआधी घडली आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी यांचीदेखील गोळीबार करुन हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली होती. पण आज शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत झालेली घटना ही वेगळी असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईत शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत मंगळवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास तरुणीवर गोळीबार करण्यात आला. पूर्ववैमनस्यातून ही गोळीबाराची घटना घडल्याची माहिती प्राथमिक तपासातून समोर येत आहे. वैयक्तिक वादातून ही घटना झाल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलीस या घटनेचा सविस्तर तपास करत आहेत. या घटनेची सध्या परिसरातील नागरिकांमध्ये चांगलीच चर्चा सुरु आहे.

**तरुणीवर गोळी कुणी झाडली? मोठी माहिती समोर**

मृतक तरुणीवर त्याच परिसरात राहणाऱ्या एका महिलेने गोळी झाडून ठार केल्याची माहिती आहे. ही तरुणी आपल्या पतीसोबत जवळीक करीत असल्याचा महिलेला संशय होता. त्यातून दोन दिवसांपूर्वी दोघींमध्ये जोरदार भांडण झाले होते. त्याचाच राग काढण्यासाठी हे कृत्य केल्याचे म्हटले जात आहे. गोळीबार करणारी महिला फरार असून पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती आहे.

आरोपी महिलेकडे गोळीबार करण्यासाठी पिस्तूल कुठून मिळाली? हा देखील प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यामागचं कारण पोलीस शोधून काढतात का? ते पाहणं महत्त्वाचं आहे. दरम्यान, गोळी लागल्यानंतर तरुणी बरेच अंतर चालून गेल्याने नेमकं घटनास्थळ संध्याकाळपर्यंत पोलिसांना कळत नव्हतं. पोलीस आता या प्रकरणी सखोल तपास करत आहेत.

## येरवड्यात गुटखा तस्करीवर पोलिसांचा मोठा घाव;

### २० लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त:



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१०, येरवडा (पुणे) :** लक्ष्मीनगर, येरवडा परिसरात बेकायदेशीर गुटखा तस्करीवर येरवडा–लक्ष्मीनगर पोलिसांनी ठोस कारवाई करत तस्करांच्या हालचालींना मोठा आळा घातला आहे. चारचाकी पिकअप टेम्पोमधून मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिस नाईक भीमराव कांबळे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने विशेष पथक तयार करून कारवाईचे नियोजन करण्यात आले.

पोलिसांनी लक्ष्मीनगर परिसरात संशयित वाहनावर पाळत ठेवून नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचला. काही वेळातच संशयित पिकअप टेम्पो अडवून त्याची झडती घेण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनातून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर गुटखा साठा तसेच रोख रक्कम आढळून आली. या कारवाईत ८ लाख ३३ हजार ८१५ रुपये रोख आणि १२ लाख रुपये किमतीचा पिकअप टेम्पो असा एकूण २० लाख ५३ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

सदर प्रकरणी संबंधित आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याविरोधात आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. शहर पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार गुटखा, पानमसाला व तत्सम प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतूक व विक्रीविरोधात कठोर भूमिका घेतली जात असून ही कारवाई त्याचाच भाग असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

डीपी पथकाने अचूक माहिती, सतर्कता व समन्वय राखत ही कारवाई यशस्वी केली. येरवडा–लक्ष्मीनगर परिसरात अवैध व्यवसायांविरोधात पुढील काळातही अशाच धडक कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

# अजितदादांच्या मृत्यूबद्दल रोहित पवारांना संशय...

## हे तर बॉम्ब ठेवण्यासारखं! पेट्रोल कॅनचा केला उल्लेख

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाबद्दल त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. अजित पवारांचा मृत्यूमागे अपघात होता की घातपात, अशा शंका त्यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून उपस्थित केल्या. अजित पवार यांचं २८ जानेवारीच्या सकाळी पावणे नऊच्या सुमारास बारामतीत विमान अपघातात निधन झालं.

अजित पवार प्रवास करत असलेलं विमान व्हिएसआर कंपनीच्या मालकीचं होतं. अजित पवार बम्बार्डियर कंपनीनं तयार केलेल्या लियरजेटनं प्रवास करत होते. या कंपनीकडे सर्वाधिक लियरजेट विमानं असल्याची माहिती रोहित पवारांनी पत्रकार परिषदेत दिली. अजित पवार २७ जानेवारीच्या संध्याकाळीच मुंबईहून बारामतीला कारनं जाणार होते. त्यांचा ताफादेखील सज्ज होता. पण त्या दिवशी संध्याकाळी त्यांना काही कामं मार्गी लावताना उशीर झाला. त्यामुळे त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी विमानानं बारामतीला जाण्याचा निर्णय घेतला, अशी माहिती रोहित पवारांनी दिली.

व्हिएसआर कंपनीच्या विश्वासार्हतेबद्दल रोहित पवारांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. विमानांची देखभाल दुरुस्ती, पायलट्सच्या शिफ्ट, त्यांच्या वेळा या सगळ्याबद्दल रोहित पवारांनी धक्कादायक माहिती दिली. विमानाचे पायलट ऐनवेळी का बदलण्यात आले, ज्या सुमित कपूर यांना मद्यपानाचं व्यसन आहे, त्यांना अजित पवारांच्या विमानाची जबाबदारी का देण्यात आली, विमान उड्डाण करण्याआधी त्यांची ब्रेथ



ऍनलायझर टेस्ट झाली होती, अशी प्रश्नांची सरबत्ती रोहित पवारांनी केली.

अजित पवारांच्या अकाली निधनानंतर आम्ही व्हिएसआर कंपनीबद्दल बरीच माहिती मिळवली. या कंपनीची एक सवय आहे. या कंपनीच्या विमानांमध्ये मागच्या बाजूला पेट्रोलचे कॅन असतात. त्यात ५०-५० लीटर पेट्रोल राहू शकतं. ही माहिती मला याच कंपनीत काम केलेल्या एका अधिकाऱ्यानं दिली. विमानात अधिकचं इंधन ठेवलं जातं. अशा प्रकारे इंधन ठेवण्याची परवानगी नसते. हा प्रकार अवैध आहे. विमानात पेट्रोलचे कॅन ठेवणं अवैध आहे. अशा प्रकारे पेट्रोल ठेवणं एखादा बॉम्ब ठेवण्यासारखं आहे, असा दावा रोहित पवारांनी केला.

२०२३ मध्ये व्हिएसआर कंपनीच्या लियरजेट विमानाला मुंबईत अपघात झाला. त्या विमान अपघाताचा अहवाल अद्याप आलेला नाही. अजित दादांच्या अपघातानंतर संबंधित यंत्रणेला जाग आली.

अपघाताचा तपास अहवाल लवकरच येणार असल्याची बातमी मग समोर आली. मुंबईतील विमानतळावर सर्व सुविधा, अत्याधुनिक यंत्रणा असताना व्हिएसआरच्या विमानाला अपघात कसा काय झाला? बाकीची विमानं तेव्हा व्यवस्थित उतरत असताना व्हिएसआरचं विमान कसं काय घसरलं, असे सवाल रोहित पवारांनी विचारले.

# पालघरमध्ये हेलिकॉप्टरचं इमर्जन्सी लँडिंग !

## तांत्रिक बिघाड असूनही पायलटच्या निर्णयामुळे जीवितहानी टळली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, पालघर :** तांत्रिक बिघाड झाल्याने एका हेलिकॉप्टरची इमर्जन्सी लँडिंग करण्यात आल्याची घटना केळवे रोड परिसरात घडली आहे. पायलटने प्रसंगावधान राखत शाळेच्या खुल्या मैदानात हेलिकॉप्टरची लँडिंग सुरक्षितपणे केल्याने मोठा अनर्थ टळला आहे. हेलिकॉप्टर पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी केल्याचे पहावयास मिळाले.

**सुरत येथे सरावासाठी एक हेलिकॉप्टर**

मुंबईतील जुहू येथून निघाले होते. पालघर जिल्ह्यातील केळवे रोड, सफाळे दरम्यान आल्यानंतर या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचा सिग्नल मिळाला. पायलटच्या ही बाब निदर्शनास



आल्यानंतर त्याने तातडीने परिसरात जवळच असलेले खुले मैदान शोधले. त्यानंतर या हेलिकॉप्टरची केळवे रोड येथील विद्या वैभव हायस्कूलच्या खुल्या मैदानात इमर्जन्सी लँडिंग करण्यात आली. शाळेच्या मैदानात हेलिकॉप्टर उतरले असल्याची बाब स्थानिकांनी पाहिल्यानंतर याबाबतची माहिती पोलिसांना देण्यात आली. सफाळे पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि मदतीबाबत हेलिकॉप्टर मधील पायलट व इंजिनिअर यांना विचारणा करण्यात आली.

**चार जण वाचले**

दरम्यान हेलिकॉप्टर मधील पायलट आणि इंजिनिअर यांनी तांत्रिक पथकाशी विमानामधील बिघाडा बाबत संपर्क साधला. त्यानंतर हेलिकॉप्टरमधील तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्यात आला. सुरक्षिततेच्या दृष्टीने हेलिकॉप्टर सुरतच्या दिशेने न जाता जुहू येथील मुख्य कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलेल्या या हेलिकॉप्टरमध्ये ज्युनियर पायलट, सीनियर पायलट, इंजिनियर तसेच आणखी एक व्यक्ती असे एकूण चार जण प्रवास करत होते. हेलिकॉप्टरच्या पायलटने प्रसंगावधान राखत वेळीच खुल्या मैदानात हेलिकॉप्टर लँड केल्याने मोठा अनर्थ टळला. शाळेच्या मैदानात उतरलेले हेलिकॉप्टर पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली.

**जुहूकडे पुन्हा रवाना**

तांत्रिक बिघाड झाल्याने हेलिकॉप्टर आपत्कालीन परिस्थितत केळवे रोड येथील शाळेच्या मैदानात उतरवण्यात आले होते. तांत्रिक बिघाड दुरुस्त करून पुन्हा हेलिकॉप्टर सुरक्षितपणे जुहूकडे रवाना झाले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. अशी माहिती सफाळे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता शेळके यांनी दिली आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मंत्रालयात पदभार स्वीकारला



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील दालनात उपमुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभागांचा पदभार स्वीकारला. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुनील तटकरे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख यांच्यासह आमदार, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## मंत्रालयात'सेफर इंटरनेट डे'कार्यक्रम साजरा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१०, मुंबई :** नागरिकांनी डिजिटल व्यसनापासून दूर राहून,इंटरनेटचा जबाबदारीने आणि सुरक्षित वापर करावा,असे आवाहन सांस्कृतिक कार्य,माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केले.शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे मंत्रालयात आयोजित'सेफर इंटरनेट डे'कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल,अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा,माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग,माहिती तंत्रज्ञान विभागाच्या संचालक भुवनेश्वरी एस,राज्य सूचना विज्ञान अधिकारी सपना कपूर,चेन्नई तील तज्ज्ञ श्रावण शेट्टी,भरत राजगोपालन आणि मंत्रालयातील अधिकारी,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मंत्री ॲड. शेलार म्हणाले की,इंटरनेट आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. मात्र,त्याचा अतिरेक टाळून तो मर्यादित आणि सुजाणपणे वापरणे आवश्यक आहे. भारताच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात देखील डिजिटल व्यसनाधीनतेचा धोका अधोरेखित करण्यात आला असून,त्यामुळे व्यक्तीची उत्पादकता आणि निर्णयक्षमता कमी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# अलिबागमध्ये भाजप, शेकाप, शिंदेसेना यांच्यातील टफ फाईटमध्ये कोणी मारली बाजी?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, रायगड :** रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीत अलिबाग तालुक्यात मतदारांनी स्पष्ट संदेश देत जुने राजकीय किल्ले उद्धवस्त केले असून भाजप व शेतकरी कामगार पक्षाला जोरदार धक्का दिला आहे. एकेकाळी प्रभावशाली मानले जाणारे पेझारी संस्थान या निवडणुकीत पूर्णपणे कोसळल्याचे चित्र दिसून आले आहे. या निकालांमध्ये शहापूर जिल्हा परिषद गटाचा निकाल सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला आहे.

शहापूर गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे अमित नाईक यांनी तब्बल ८,९०८ मते मिळवत दणदणीत विजय मिळवला. या लढतीत त्यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सुभाष पाटील ऊर्फ

### शहापूरचा निकाल सर्वाधिक चर्चेत...





पंडित पाटील यांचे पुत्र सवाई पाटील, शिवसेना शिंदे गटाचे गिरीश पाटील तसेच शेकापचे उमेदवार यांचा पराभव केला. विशेष म्हणजे माजी आमदारांचे पुत्र असलेल्या सवाई पाटील यांना अत्यल्प मते मिळाल्याने ते चौथ्या क्रमांकावर फेकले गेले. या निकालामुळे पाटील कुटुंबाच्या राजकीय प्रभावाला मोठा धक्का बसल्याची चर्चा अलिबाग तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात रंगली आहे. शहापूरचा हा निकाल केवळ एका गटापुरता मर्यादित नसून, बदलत्या राजकीय प्रवाहाचे प्रतीक मानला जात आहे.

दरम्यान, आंबेपूर जिल्हा परिषद गटातही भाजपला जोरदार झटका बसला आहे. शिवसेना शिंदे गटाच्या रसिका केणी यांनी भाजपच्या महिला आघाडी अध्यक्षा व माजी जिल्हा परिषद सभापती चित्रा पाटील यांचा तब्बल ४,५१५ मतांनी दणदणीत पराभव केला. चित्रा पाटील या माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांच्या सुनबाई असूनही मतदारांनी त्यांना स्पष्ट नकार दिला. या निकालामुळे अलिबाग तालुक्यात भाजपच्या संघटनात्मक ताकदीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, पेझारी संस्थानाच्या प्रभावाला निर्णायक धक्का बसल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

या निवडणुकीत अलिबाग तालुक्यात मतदारांनी घराणेशाही, जुने राजकीय गणिते आणि पारंपरिक प्रभावांना नाकारत बदलाचा कौल दिला असल्याचे स्पष्ट झाले आहे. शहापूर व आंबेपूर या दोन्ही गटांतील निकालांमुळे अलिबाग तालुक्यातील राजकीय समीकरणे पूर्णतः बदलण्याची चिन्हे दिसत असून, आगामी काळात जिल्हा परिषद व स्थानिक राजकारणात नव्या नेतृत्वाची भूमिका अधिक ठळक होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# संपादकीय

## आता मिळून सारे काम करुया...

उत्तर महाराष्ट्रातील चारपैकी तीन महापालिकांत भाजपला दणदणीत यश मिळाले असल्याने अपेक्षेप्रमाणे तीनही ठिकाणी या पक्षाचे बिनविरोध महापौर निवडून आले. काही 'अभद्र' घडण्याची शक्यता असल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या मालेगाव महापालिकेत मात्र निवडणूक झालीच. सर्वाधिक जागा मिळवणारी इस्लाम पार्टी व समाजवादी पक्षाची सेक्युलर फ्रंट प्रथमच सत्तेवर आली. इस्लाम पार्टीच्या नसरीन बानो शेख आणि समाजवादी पक्षाच्या शान-ए-हिंद अनुक्रमे महापौर व उपमहापौरपदी निवडून आल्या. शिवसेनेचे दोन्ही उमेदवार ४३ विरुद्ध १८ अशा मोठ्या फरकाने पराभूत झाले.

शिक्षणमंत्री दादा भुसे 'एमआयएम'च्या साथीने काही चमत्कार घडवतील, अशी अटकळ बांधली जात होती खरी; परंतु ही संभाव्य युती दोघांसाठीही तापदायक ठरणार होती. शिवाय, सेक्युलर फ्रंट फोडण्याची रणनीतीही अयशस्वी ठरली. काँग्रेसच्या साथीने या आघाडीने मालेगावी झेंडा फडकावल्याने शेवटी शिवसेनेला विरोधी बाकावर बसावे लागले. इकडे नाशिकमध्येही भाजपने अखेरच्या क्षणी शिवसेना शिंदे गटाला सोबत घेतल्याने निवडणूक टळून महापालिकेवर युतीचा भगवा फडकला. महापौरपदी भाजपच्या हिमगौरी आहेर-आडके, तर उपमहापौरपदी शिंदे सेनेचे विलास शिंदे यांची बिनविरोध झाल्यानंतर दोन्ही पक्षांनी एकत्रितपणे विजयाचा गुलाल उधळला. 'आवश्यकता वाटल्यास आम्ही निवडणुकीनंतर एकत्र येऊ शकतो,' ही टेप उभय पक्षांनी मतदानाआधीच वाजवून ठेवली होती. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कशाच्या बदल्यात किंवा कोणत्या अटी-शर्तींवर शिंदे गटाला सोबत घेण्यात आले, हे यथावकाश समोर येईलच; परंतु त्याआधी यानिमित्ताने या दोन्ही पक्षांत घडलेल्या 'रामायणा'चाही आढावा घ्यायला हवा.

उमेदवारी अर्जवाटपादरम्यान भाजपमध्ये मंत्री गिरीश महाजन विरुद्ध स्थानिक तीन आमदार हा उफाळलेला संघर्ष उभ्या महाराष्ट्राने पाहिला. भाजपबाबत कमालीचे नकारात्मक वातावरण असतानाही साम-दाम-दंड-भेद नीतीच्या जोरावर या पक्षाने बहुमताचा आकडा सहज पार केला. 'शंभर प्लस'चा फुगा फुटला असला, तरी मागील खेपेपेक्षा सहा अधिक जागा मिळाल्या. एकूणच, महाजन हेच पक्षाचे कर्तेकरविते आणि संकटमोचक असल्याचेही सिद्ध झाले. महापौरपदाच्या निवडीत शहराध्यक्ष सुनील केदार यांच्या आडून आमदारांनी महाजन यांच्याविरोधात मोट बांधण्याचा आणखी एक प्रयत्न केला खरा; परंतु महाजनांनी तो काही तासांतच नुसता हाणूनच पाडला नाही, तर नंतर सर्वांना 'मम' म्हणायला भाग पाडले.

प्रदेशाध्यक्षांना मोबाइलवर मेसेज पाठवून राजीनामा देणाऱ्या केदार यांना घुमजाव करावे लागले. दुसऱ्या शहराध्यक्षपदाच्या निवडीची प्रक्रिया सुरू झाल्याचा निरोप त्यांच्यापर्यंत पोचवण्यात आला होता. केवळ एका मेसेजच्या जोरावर उमराळेच्या (दिंडोरी) या गड्याने चाळीस वर्षांची कारकीर्द पणाला लावली होती. भाजपमध्ये अंतर्गत मतभेदांचे जाहीर प्रदर्शन केले जात नाही आणि तसे करणाऱ्यांना खपवून घेतले जात नाही, याचा विसर केदार यांना पडला असावा. वरिष्ठांचा रट्टा आणि त्या जोडीला पद व प्रतिष्ठा टिकविण्याच्या लालसेने त्यांनी माघार घेतली. शेवटी केवळ नाशिकच नव्हे, तर संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात 'मी ठरवेन ती पूर्वदिशा' हे महाजन यांनी दाखवून दिले.

हिमगौरी आडके-आहेर यांच्या निवडीने महापौरपदाच्या स्पर्धेत असलेल्या दीपाली कुलकर्णी, स्वाती भामरे, माधुरी बोलकर, रोहिणी पिंगळे आदींचा हिरमोड झाला. आमदार सीमा हिरे यांनी आग्रह धरल्याने बोलकर यांचेही नाव आघाडीवर होते. परंतु, एका नेत्याशी निष्ठा असली की कधी कधी नुकसानही होऊ शकते, याची प्रचीती बोलकर यांना आली. बोलकर कुटुंबीय पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांचे समर्थक मानले जातात. महाजन आणि रावल यांच्यात फार सख्य नसल्याने त्याचा फटका ओबीसी चेहरा असलेल्या बोलकर यांना बसला असावा. दुसरीकडे, उपमहापौरपदासाठी अर्ज भरलेले माजी आमदार बाळासाहेब सानप यांचे पुत्र मच्छिंद्र सानप यांना शेवटच्या सात मिनिटांत माघार घेणे भाग पडले. शिंदे सेनेसोबत युती झाल्याने त्यांचा पत्ता कट झाला. नाराज सदस्यांची आता स्थायीसह विविध समित्यांवर वर्णी लागू शकते. असो.


सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर अनुभवी, उच्चशिक्षित, सुसंस्कृत चेहरा भाजपला हवा होता, जो हिमगौरी आहेर-आडके यांच्या रुपाने गवसला. हिमगौरी हे साक्षात पार्वतीचे नाव आहे आणि शिवशंकराचे स्थान मानल्या जात असलेल्या ब्रह्मगिरीतून उगम पावणाऱ्या गोदावरीच्या तीरावर कुंभमेळा भरण्याच्या काळातच आडके यांची महापौरपदी निवड होणे, हासुद्धा निव्वळ योगायोग समजायचा, की आणखी काही संकेत आहेत, हा ज्याचा-त्याचा मानण्या न मानण्याचा भाग. कधी काळी शाळेच्या 'हेडगर्ल' असलेल्या हिमगौरी आडके आता शहराच्या 'हेडवुमन' बनल्या आहेत. माणसाच्या भविष्यातील कारकिर्दीची बीजे त्याच्या बालपणात रुजलेली असतात, असे म्हणतात. आडके यांच्याबाबतीत ते तंतोतंत खरे ठरले. मराठी, हिंदी अन् इंग्रजी भाषेवरही उत्तम प्रभुत्व असलेल्या हिमगौरी यांना कुंभमेळ्यात देशभर कामाचा ठसा उमटवण्याची नामी संधी आहे, ती त्या दवडणार नाहीत याची खात्री वाटते.

दिवंगत माजी मंत्री तथा काका डॉ. दौलतराव आहेर तसेच स्थायी समितीचे सभापती राहिलेले वडील बाळासाहेब आहेर यांचा राजकीय वारसा हिमगौरी यांना आहे. त्यांच्या आई प्रा. शोभना आहेर यांना २००३ च्या कुंभमेळ्यात उपमहापौरपदाची संधी मिळाली आणि मुलीने पुढचे पाऊल टाकत कुंभेळ्याच्या तोंडावर थेट महापौरपदच मिळविले! नाशिककरांना विकासकामांच्या रूपाने न्याय देऊन या संधीचे सोने केल्यास येत्या काळात विधानसभा वा लोकसभेसाठीही त्यांची दावेदारी अधिक मजबूत होऊ शकते. अर्थात, राजकारणात कधी काय होईल याचा नेम नाही. कधी कधी केवळ कर्तृत्व वा 'गॉडफादर' असूनही भागत नाही, नशीबही बलवत्तर असावे लागते, ज्याची प्रचीती उपमहापौर म्हणून निवडले गेलेल्या विलास शिंदे यांच्या रूपानेही आलीच.

ठाकरेंच्या शिवसेनेतून अंमळ उशिराने येऊनही आडनाव साधर्म्य असलेल्या या तरुण चेहऱ्यावर शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विश्वास टाकला. इतर पक्षांच्या तुलनेत छोट्या-छोट्या कार्यकर्त्यांना संधी देऊन त्यांना मोठे करण्याचे काम शिवसेनेसारख्या प्रादेशिक पक्षांनी प्राधान्याने केले. मूळ मुंगसरा येथील गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेले विलास शिंदे काही वर्षांपूर्वी रोजीरोटीसाठी सोमेश्वर येथे आले आणि 'अण्णा' म्हणून गावचे झाले. आज सोमेश्वरसह गंगापूर, आनंदवली, सातपूर या पट्ट्यात त्यांचे समर्थक आहेत. गंगापूर गावची सोयरीक असलेल्या शिंदे यांनी यापूर्वी २००३-०४ च्या कुंभमेळ्यात तत्कालीन महापौरांचे स्वीय सहायक म्हणूनही काम केल्याने त्याचा फायदा त्यांना निश्चितच होईल. नगरसेवक म्हणून तीन 'टर्म' निवडून येताना शिंदे यांनी आपल्या या 'गुरू'ने केलेल्या चुका शिताफीने टाळल्या, हे महत्त्वाचे!

**- संपत थेटे**

# ।। नमस्कार माझा सदगुरु रामदासा ।।





**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा. ८९९९५६६९१७**

नारायण सूर्याजीपंत ठोसर म्हणजेच समर्थ रामदास म्हणजे रामदास स्वामी यांचा जन्म २४ मार्च १६०३ जांब, जिल्हा जालना येथे झाला. लहानपणी ते खोडकर होते पण अतिशय बुद्धिमान होते साहसी होते. झाडावर उड्या मारणे, पुरात पोहणे, घोड्यावर रपेट करणे, या गोष्टीत ते तरबेज होते. त्यांची आठ मित्र होते. एक सुतार, दुसरा गवंडी, तर एक लोहाराचा, एक गवळ्याचा, आणि या मित्रांच्या सहवासात त्यांनी त्या त्या व्यवसायाचे उत्तम ज्ञान प्राप्त करून घेतले होते. निरीक्षण आणि अनुभवाने सर्व गोष्टी शिकल्या होत्या. एकदा ते लपून बसले होते, काही केल्या सापडत नव्हते. अखेर ते सापडले तेव्हा त्यांना काय करीत होतास असे विचारणार ते आईला म्हणाले मी विश्वाची चिंता करतो. तेव्हा या मुलाला संसारात अडकवले तर ताळ्यावर येईल या कल्पनेने त्यांचे वयाच्या बारावी वर्षी लग्न ठरविले. लग्नात सावधान हा शब्द उच्चारताच तो ऐकून ते नेसलेल्या व पांघरलेल्या वस्त्रांनिशी मंडपातून पळाले. लोकांनी खूप पाठलाग केला परंतु ते हाती लागली नाही.

तिथून निघून ते पायी चालत चालत पंचवटीत आले व रामाचे दर्शन घेतले. ते नाशिक टाकळीला आले .समर्थांनी बारा वर्षे तपस्या केली. तिथेही त्यांनी आपल्याला ओळखू नाही म्हणून रामदास हे नाव धारण केले. १६२१ ते १६३३ असे बारा वर्षे ते टाकळी येथे राहिले. तेथे साधना केली रोज ब्राह्म मुहुर्तावर ते सूर्यनमस्कार घालत. राम नामाचे १३ कोटी वेळा नामस्मरण करून झाल्यावर त्यांनी कार्याला आरंभ केला. त्यांनी साक्षात प्रभू राम चंद्रांना सद्गुरु मानले. तिथेच त्यांनी वेद उपनिषदे व शास्त्रे याचा अभ्यास केला. रामाची उपासना केली, प्रार्थना केली, करुणाष्टके लिहीलीत.

**सदा सर्वदा योग तुझा घडावा ।**
**तुझे कारणी देह माझा पडावा।**
**उपेक्षु नको गुणवंता अनंता।**
**रघुनायका मागणे हेचि आता...**
तुजविण रामा मजकंठवेना

हिच ती करुणाष्टके आहेत.. आहेत बारा वर्ष तीव्र उपासना केल्यानंतर त्यांना आत्मसाक्षात्कार झाला असे म्हणतात. त्यावेळी त्यांचे वय २४ वर्षाचे होते. नाशिक टाकळी येथे त्यांनी गोमय, गाईच्या शेणापासून हनुमंताची स्थापना केली. हनुमान हे शक्तिशाली, बुद्धीची देवता आहे आणि त्यामुळे तिची उपासना केली पाहिजे असा समर्थांचा या म ागचा विचार होता. इथले तपश्चर्या नंतर त्यांनी बारा वर्षे भारतभर भ्रमंती केली. निरनिराळ्या ठिकाणच्या समाजाच्या स्थितीचे निरीक्षण केले. भारतभर भ्रमंती केल्यानंतर ३६ व्या वर्षी रामदास स्वामी पैठणला परत आले व पैठणला ते एकनाथांच्या वाड्यातच उतरले होते.

**।। जय जय रघुवीर समर्थ।।**

या गर्जनेने मरगळलेला महाराष्ट्र जागा झाला.

प्रभू श्री रामचंद्र, आदिशक्ती तुळजाभवानी आणि शक्तीचे उपासनासाठी श्री हनुमंत या तीन देवतांची उपासना केली.

**सामर्थ्य आहे चळवळीचे,**
**जो जो करील तयाचे।**
परंतु, तेथे अधिष्ठान पाहिजे। भगवंताचे।

यानुसार त्यांनी भगवंतांची अधिष्ठान असलेली चळवळ

निर्माण करण्याचा प्रयत्न केला समाज प्रबोधन करण्याचे समर्थांचे मुख्य उद्दिष्ट होते.त्यांनी भक्तिम ार्गाचा प्रसार केला. भक्ति केल्यामुळे देव निश्चितपणे प्राप्त होतो असे त्यांनी दासबोधात सुरुवातीला सांगितले आहे.

त्यांनी स्वतः बारा वर्षे नामस्मरण व भक्ती केली त्याचा प्रसार केला ते म्हणत ज्या घरांमध्ये रामराम नाही ते घर सोडून खुशाल अरण्यात निघून जावे.

ते महाराष्ट्रातील समर्थ संप्रदायाचे संस्थापक होते.

**शुका सारखे पूर्ण वैराग्य ज्याचे**
**वशिष्ठा परी ज्ञानयोगेश्वराचे**
**कवी वाल्मीका सारखा मान्य ऐसा**
**नमस्कार माझा सद्गुरु रामदासा....**

असे वामन पंडितांनी समर्थ रामदासांना उद्देशून लिहिले आहे.

दास मारुती, चाफळ. वीर मारुती, चाफळ. खडीचा मारुती, शिंगणवाडी, चाफळ. प्रताप म ारुती, माजगाव, चाफळ. उंब्रज मारुती, तालुका कराड. शहापूर मारुती, उंब्रज जवळ. मसूर मारुती, तालुका कराड. बहे बोरगाव कृष्णामाई मारुती, जिल्हा सांगली. शिराळा मारुती,बत्तीस शिराळा, जिल्हा सांगली. मंडपाळे मारुती, जिल्हा कोल्हापूर. पारगाव मारुती, जिल्हा कोल्हापूर. अशा अकरा मारुतीची स्थापना त्यांनी केली. गावोगावी मारुतीची मंदिरे बांधली. मारुती शक्ती देवता असल्याने मंदिराच्या परिसरात ते तरुणांना संघटित करीत आणि व्यायामाची प्रेरणा देत होते.

समर्थ रामदासांनी अकरा मारुती स्थापना केली तसेच

जांब, चाफळ, सज्जनगड, डोणगाव, शिरगाव, कनेरी, या ठिकाणी मठाची स्थापना केली. समर्थांनी हजारचे जवळपास मंदिरे, मठ, स्थापन केले.

श्रीक्षेत्र काशी विश्वनाथ, वाराणसी दशाश्वमेध घाट येथे श्रीसमर्थ सद्गुरू रामदास स्वामीनी श्रीहनुमान मारुती मंदिर, गोमय मारुती मंदिर स्थापन केले.

समाजाविषयीच्या चळवळीतून समर्थांनी मोठीच वांग्मय निर्मिती केली. ग्रंथराज दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके, आत्माराम, भीमरूपी स्तोत्र, गणपतीची आरती, शंकराची आरती,देवीची आरती, याची रचना केली. समर्थ रामदासांनी जवळपास ८० ते ९० आरत्या लिहिले आहेत.

ग्रंथराज दासबोध या ग्रंथाची निर्मिती लिखाण शिवथरघळ येथे केली. आपल्या ग्रंथाच्या माध्यम ातून जीवनात आलेल्या अनेक अनुभवातून समर्थ रामदासांनी लोकांना समाजात कसे राहावे कसे वागावे याविषयी अनेक प्रकारांनी मार्गदर्शन केले आहे व संदेश दिले आहेत.

**मना सज्जना भक्ती पंथेची जावे**
**तरी श्रीहरी पावी जे तो स्वभावे**
**जनी निंद्य ते सर्व सोडूनि द्यावे**
**जनी वंद्य ते सर्व भावे करावे...**

असे २०५ मनाचे श्लोक लिहिलेत.. त्या प्रत्येकात त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

समर्थांनी राष्ट्र उभारण्यासाठी कार्य केले तसेच लोकशिक्षण, प्रपंच, परमार्थ, विवेक, यावर भर दिला. कारण यातूनच राष्ट्र उभे राहते स्वराज्य स्थापन होते लोकांनी साक्षर व्हावे यासाठी त्यांनी लिहिण्याची वाचण्याची सवय लागावी..

म्हणून ते म्हणतात
**दिसा माजी काहीतरी लिहावे**
**प्रसंगी अखंडित वाचीत जावे..**
पुढे म्हणतात
**जे जे आपणासी ठावे तेथे शिकवावे**
**शहाणे करून सोडावे सकाळ जन.**

पुढे ते म्हणतात प्रपंच सोडून परमार्थ केला तर केवळ आत्मांनद होईल, परंतु प्रपंच करून परमार्थ केला तर राष्ट्रोन्नती होईल म्हणूनच...

**प्रपंची जे सावधान ।**
**तोचि परमार्थ करील जाण।**
**प्रपंची जो अप्रमाण।**
**तो परमार्थी खोटा।।**

छत्रपती शिवाजी महाराज हे समर्थ राम दास स्वामींच्या विचाराचे होते तसेच स्वराज्य रक्षणासाठी समर्थ शिवाजी महाराज सोबत होते. ३१ नोव्हे.१६७८ मध्ये समर्थ रामदास स्वामींना एक विस्तृतक्ष पत्र लिहून काही गावे भेट म्हणून दिली होती अशीही नोंद आहे.

निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी, यशवंत, कीर्तीवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, पुण्यवंत, नीतीवंत, जाणता राजा असे छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन समर्थ रामदासांनी केले आहे.

श्रीसमर्थ रामदासांनी आपल्या मठांमध्ये जे नियम घालून दिले होते. त्यापैकी एक नियम होता, रामदासी संप्रदायातील अनुग्रहित किंवा उपासक स्त्रियांना मठातील स्वयंपाक वा स्वयंपाकाशी संबंधित कोणतीही कामे न देण्याचा. त्यामुळे मठात स्वयंपाक करण्यापासून ते जेवण वाढण्यापर्यंतची सर्व कामे पुरुष उपासकच करत. नित्यनियमाने त्यांच्याकडून केली जाणारी स्वयंपाकादी कामे किंवा स्वच्छतेची कामे स्त्रियांना न देण्याचा आणि अन्य महत्त्वाच्या क्षेत्रातील कामे करण्याचा पायंडाच श्रीसमर्थांनी आपल्या मठांमध्ये पाडला.

● याशिवाय, उपासक म्हणून रामदासी मठांम ध्ये आलेल्या स्त्रियांना लिहिण्या-वाचण्यासारखी बौद्धिक व दफ्तरी कामे देण्याचा नियम श्रीसमर्थांनी आखून दिला होता. हा नियम देशभरातील आठ राज्यात शिल्लक असलेल्या २५० हून अधिक मठांम धून आजही पाळला जातो !

● पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही परमार्थाचा अधिकार आहे असे श्रीसमर्थांचे मत होते. स्त्रियांनी धर्म आणि अध्यात्म या दोन्ही ठिकाणी नेतृत्व करावे अशी एक वेगळीच भूमिका श्रीसमर्थ रामदासांनी म ांडली होती आणि त्यानुसार त्यांनी आचरणही केले. मठांवर मठाधिपती म्हणून श्रीसमर्थांनी स्त्रियांची नेम णूक केली. ज्या स्त्रियांना लिहिता- वाचता येत नसे त्यांना रामदासी मठामध्ये लिहायला व वाचायला शिकविले जाई. लिहिण्या-वाचण्यास आल्यानंतर त्या स्त्रियांना विविध ग्रंथांचा अभ्यास, पारायणे, जप-जाप्य -अनुष्ठाने करू दिली जात. उपासक स्त्रियांना लिहिण्या-वाचण्यास शिकवून श्रीसमर्थांनी स्त्रियांचे सबलीकरण केले !

● सातारा जिल्ह्यातील सज्जनगड हे म हाराष्ट्रातील समर्थ संप्रदायाचे पवित्र क्षेत्र आहे. या ठिकाणी शके १६०३, सन १६८१ रोजी माघ वद्य नववीला रामदास स्वामींनी समाधी घेतली. शेवटचे पाच दिवस त्यांनी श्रीरामाचे मूर्ती समोर बसून निर्जल उपावास केला. राम राम जप करीत पद्मासनाम ध्ये बसून ते ब्रह्मलीन झाले. त्याच ठिकाणी हि समाधी आहे म्हणून या तिथीला दासनवमी असे म्हणतात. या समाधीवर रामाची मूर्ती बसवून देऊळ बांधले आहे. दास नवमीला या ठिकाणी म्हणजे सज्जनगडावर अनेक ठिकाणाहून लाखोच्या संख्येने भाविक आपली हजेरी लावतात. दर्शनाचा लाभ घेतात.

**।। जय जय रघुवीर समर्थ.।।**

## महाराजे

मज साठी पायपीट
कार्यकर्ते नीतझिजे
अहोरात्र कष्ट उपसे
ना जाणे कधी निजे

उपाशी पोटी मरमर
घास भर अन्न शिजे
कधी उन्हा तळमळे
कधी पावसा भिजे

कधीकुणी न थकले
सलाम त्यांच्या उर्जे
कुणीअपशब्द बोले
त्वरित हत्यारपारजे

कोरडा जरीही घसा
घोषणा देताना गर्जे
घोडागाडी नको उगे
सिमीत ठेवती गरजे

कार्यकर्त्या फक्तप्रेम
म्हणतो मावळेमाझे
होई सखा सहकारी
बोलतो त्यांनाचराजे

जीव त्यांचा मजवरी
असह्य स्नेहाचेओझे
दुःख मला अंमळही
का डोळे त्याचे सुजे

कार्यकर्ते सोबतीला
त्यांच्या मना विराजे
सोबती मीही त्यांचा
वाटले मज महाराजे

मनीमाझ्या कार्यकर्ते
सिंहासन शोभूनसजे
तेचं खरेचं जीव प्राण
सन्मान मिळतो ध्वजे

**-- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## डेज संस्कृतीमुळे संस्कृती आणि मूल्यांशी दुरावा !

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरे करण्याचे. त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोझ डे पासून सुरू झालेला डेजचा हा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, टेडी डे, प्रॉमिस डे, चॉकलेट डे, टेडी डे, हग डे, किस डे असे विविध प्रकाराचे डे येतात. डेजचा हा माहोत्सव आठवडाभर चालतो.

तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात कारण याच वयात मनी प्रेम फुलत असते. आपल्या आवडत्या व्यक्तीला गुलाबाचे फ ुल देऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे म ाध्यम म्हणून गुलाबाकडे पाहिले जाते म्हणून या दिवसात गुलाबाच्या फुलाला खूप मागणी असते. यावेळी तरुणांच्या उत्साहाला उधाण आलेले असते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. या डेजच्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल होत असते हे जरी खरे असले तरी आपल्या म नातील भावना व्यक्त करण्यासाठी व्हॅलेन्टाईन डेजचाच मुहूर्त का लागतो ? आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नजरेचा एक कटाक्ष आणि चेहऱ्यावरील स्मितहास्यही पुरेसे असते. त्यासाठी व्हॅलेन्टाईन डेजचाच मुहूर्त असावा असे काही नाही. मुळात असे डेज साजरे करावेत की नाही यावर देखील मतमतांतरे आहेत. माझ्यामते आपल्या आवडत्या व्यक्तीवर प्रेम करण्यासाठी, आपल्या आवडत्या व्यक्तीला भेटवस्तू वस्तू देण्यासाठी, त्यांना आनंदी करण्यासाठी, त्यांना आश्चर्यचकित करण्यासाठी, त्यांना आपल्या मनातील भावना सांगण्यासाठी कोणत्याही डेची गरज नसते. बरे हे डेज पुराण तरुणांसाठीच असतात असेही नाही. आजच्या सोशल मीडियाच्या युगात डेजचे पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, ब्रदर डे, सिस्टर डे, डॉक्टर्स डे, वकील डे, इंजिनियर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अती झाले नि हसू आले अशी गत या डेजची झाली आहे. सोशल मिडीयावर ऍक्टिव्ह राहणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांच्या पोस्टवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडत असतो. वर्षभर कधी आई वडिलांप्रती प्रेम, आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप एक्टिव असतात. जन्मदात्या आई वडिलांसाठी, त्यांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम करण्यासाठी, त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डेची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमुल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेजची आवश्यकता आहे का ? असा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्यांचे अंधानुकरण केल्याम ुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!

**- श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

## प्राणांतिक अपघात रोखण्यासाठी राहुरी पोलिसांची कारवाई

### विना हेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या ५० जणांवर कारवाई; ५० हजार रुपयांचा दंड

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०२, राहुरी :** प्राणांतिक अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत विना हेल्मेट दुचाकी चालवणाऱ्यांवर विशेष कारवाई सुरू करण्यात आली असून आज पहिल्याच दिवशी ५० दुचाकीस्वारांवर कारवाई करून ५०,००० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

मा.अपर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश यांच्या सूचनेनुसार तसेच पोलीस अधीक्षक अहिल्यानगर सोमनाथ घार्गे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली. राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत सन २०२४ मध्ये ५७ तर सन २०२५ मध्ये ५८ प्राणांतिक अपघात झाले असून मागील दोन वर्षांत सुमारे ११५ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये बहुतांश अपघातांमध्ये दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर न केल्याचे निर्दशनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी विना हेल्मेट प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांवर दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी




विशेष मोहीम राबविण्यात आली. यापुढेही अशा प्रकारची कारवाई नियमितपणे सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

नगर–मनमाड महामार्गावर प्रवास करणाऱ्या सर्व दुचाकीस्वारांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी हेल्मेटचा वापर करावा, असे आवाहन राहुरी पोलिसांनी केले आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर (श्रीराम पूर विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, वाहतूक शाखेचे सहाय्यक फौजदार भाऊसाहेब आव्हाड, पोलीस हवालदार संतोष ठोंबरे, रमेश दरेकर व बापू फुलमाळी यांनी केली.

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

महाराष्ट्र वन विभाग

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**वनविभाग**
**वनक्षेत्रपाल कांदळवन कक्ष रत्नागिरी यांचे कार्यालय,**
**६६९,कल्पवृक्ष बंगला, एस. व्ही. रोड, हिंदू कॉलनी, रत्नागिरी ४१५६१२.**

''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे''
दूरध्वनी क्र.०२३५२-२९५१४०
Email-rfomratnagiri@gmail.com

## जाहिर निविदा सुचना

विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग दक्षिण कोकण अलिबाग, वनपरिक्षेत्र कांदळवन कार्यालय रत्नागिरी अंतर्गत रत्नागिरी तालुक्यातील वनविभागाच्या ताब्यात असलेले क्षेत्राचे सिमाकंन करणेकरीता कांदळवन क्षेत्राच्या हद्दीवर चैनलिंक फेन्सींग जाळी व आरसीसी पिलर्स उभारणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद व जलसंपदा विभाग या विभागांकडे वर्ग १ ते ७ वर्गातील पंजीकृत कंत्राटदारांकडून खालील नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून दिलेल्या प्रपत्रात सिलबंद लिफाफ्यामध्ये निवीदा मागविणेत येत आहेत. संबंधित कामांबाबतचे निवीदा फॉर्म व अटी शर्ती प्रती काम निहाय रूपये १०० /- रोखीन भरणा केल्यास दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत वनपरिक्षेत्र कांदळवन कार्यालय रत्नागिरी यांचे कार्यालय ६६९, कल्पवृक्ष बंगला, एस. व्ही. रोड, हिंदू कॉलनी, ता. जि. रत्नागिरी ४१५६१२ येथे उपलब्ध होईल.

| | |
|---|---|
| निवीदा प्रकाशित करावयाची तारीख | ११/०२/२०२६ |
| निवीदा फॉर्म व अटी शर्ती मिळण्याची तारीख व वेळ | ११/०२/२०२६ ते १६/०२/२०२६ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत |
| निवीदा भरण्याची अंतीम तारीख | १६/०२/२०२६ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत |
| निवीदा उघडण्याची तारीख | १८/०२/२०२६ (सोईनुसार)<br>ठिकाण : मा. विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग दक्षिण कोकण अलिबाग |

**कामाचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे - वनपरिक्षेत्र कांदळवन कार्यालय रत्नागिरी ता. जि. रत्नागिरी**

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजूर अनुदान |
|---|---|---|
| | रत्नागिरी तालुक्यातील वनविभागाच्या ताब्यात असलेले क्षेत्राचे सिमाकंन करणेकरीता कांदळवन क्षेत्राच्या हद्दीवर चैनलिंक फेन्सींग जाळी व आरसीसी पिलर्स उभारणेसाठी | |
| १. | Providing and Erecting 2.10 mtr Height Chainlink fencing supported on M.S.Angle post with Y-typebarbed wire fencing with 7 rows of wire in- Survey No.11 Mouje Karla Near Survey No.9 Under Shirgaon Beat Ratnagiri Range of Mangrove Division South Konkan | ५१०२००.०० |
| २. | Providing and Erecting 2.10 mtr Height Chainlink fencing supported on M.S.Angle post with Y-typebarbed wire fencing with 7 rows of wire in- Survey No.57 Mouje Karla Near Karla -Juve Joint Road Under Shirgaon Beat Ratnagiri Range of Mangrove Division South Konkan | ६१२८००.०० |
| ३. | Providing and Erecting 2.10 mtr Height Chainlink fencing supported on M.S.Angle post with Y-typebarbed wire fencing with 7 rows of wire in- Survey No.57 Mouje Karla Near Karla -Ambeshet Road Under Shirgaon Beat Ratnagiri Range of Mangrove Division South Konkan | ९९७८००.०० |
| ४. | Providing and Erecting 2.10 mtr Height Chainlink fencing supported on M.S.Angle post with Y-typebarbed wire fencing with 7 rows of wire in- Survey No.11 Mouje Karla Near Survey No.10 and 6 Under Shirgaon Beat Ratnagiri Range of Mangrove Division South Konkan | ६९३४००.०० |
| ५. | Providing and Erecting 2.10 mtr Height Chainlink fencing supported on M.S.Angle post with Y-typebarbed wire fencing with 7 rows of wire in- Survey No.11 Mouje Karla Near Survey No.12 and 13 Under Shirgaon Beat Ratnagiri Range of Mangrove Division South Konkan | ८८५९००.०० |
| ६. | Providing and Erecting 2.10 mtr Height Chainlink fencing supported on M.S.Angle post with Y-typebarbed wire fencing with 7 rows of wire in- Survey No.05 Mouje Golap Muslamnwadi Under Gaonkhadi Beat Ratnagiri Range of Mangrove Division South Konkan | ६३८९००.०० |
| ७. | Providing and Erecting 2.10 mtr Height Chainlink fencing supported on M.S.Angle post with Y-typebarbed wire fencing with 7 rows of wire in- Survey No.57 Mouje Karla Near Survey Near Ambeshet-Karla-Juve Joint road Under Shirgaon Beat Ratnagiri Range of Mangrove Division South Konkan | ७७२१००.०० |
| ८. | Providing and Erecting 2.10 mtr Height Chainlink fencing supported on M.S.Angle post with Y-typebarbed wire fencing with 7 rows of wire in- Survey No.05 P Mouje Golap Muslamnwadi Under Gaonkhadi Beat Ratnagiri Range of Mangrove Division South Konkan | ५४०८००.०० |
| ९. | Providing and Erecting 2.10 mtr Height Chainlink fencing supported on M.S.Angle post with Y-typebarbed wire fencing with 7 rows of wire in- Survey No.35 Mouje Karla Under Shirgaon Beat Ratnagiri Range of Mangrove Division South Konkan | ९७९७००.०० |
| १०. | Erection of Boundry Demarcation Pillars at Watad Village in Kasari Beat under Ratnagiri Round for the Mangrove Division South Konkan | ७२९९००.०० |
| ११. | Erection of Boundry Demarcation Pillars at Warwade Village in Aare Beat under Ratnagiri Round for the Mangrove Division South Konkan | ५७२७००.०० |
| १२. | Erection of Boundry Demarcation Pillars at Various Village in Gaonkhadi Beat under Ratnagiri Round for the Mangrove Division South Konkan | १०३३००.०० |
| १३. | Erection of Boundry Demarcation Pillars at Karla Village in Shirgaon Beat under Ratnagiri Round for the Mangrove Division South Konkan | १३७५००.०० |
| १४. | Erection of Boundry Demarcation Pillars at Various Village in Aare Beat under Ratnagiri Round for the Mangrove Division South Konkan | ७०८७००.०० |
| १५ | Erection of Boundry Demarcation Pillars at Various Village in Kasari Beat under Ratnagiri Round for the Mangrove Division South Konkan | ७९३४५०.०० |
| | **एकूण रक्कम** | ९६७७१५०.०० |

तरी इच्छूक कंत्राटदार यांनी निवीदा कालावधी वनपरिक्षेत्र कांदळवन कार्यालय रत्नागिरी येथे निवीदा सादर कराव्यात. अधिक माहितीसाठी वनपरिक्षेत्र कांदळवन कार्यालय रत्नागिरी यांचे कार्यालयाशी सुट्टीच्या दिवसाखेरीज कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**ठिकाण :- रत्नागिरी**

**(सही)**
**(किरण दोलत ठाकूर)**
**वनक्षेत्रपाल कांदळवन कक्ष,**
**रत्नागिरी**

# नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन २ मार्च रोजी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, नवी मुंबई :** महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. नमुंमपा सार्वत्रिक निवडणुक आचारसंहितेमुळे माहे जानेवारी २०२६ व माहे फेब्रुवारी २०२६ महिन्याचे लोकशाही दिन आयोजित करण्यात आले नव्हते आता माहे मार्च महिन्याचा लोकशाही दिन दि.०२ मार्च २०२६ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि.१६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे. लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in`m संकेतस्थळाच्या (Website) मुख्यपृष्ठावर जलद दुवे (Quick Links) आयकॉनवर उपलब्ध असून ती अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से.१५ ए, किल्ले गांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथेही प्रत नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे.



अर्ज करताना नागरिकांनी शासन निर्णयानुसार अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे याची दखल घ्यावयाची आहे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे.

याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक- आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावयाची आहे.विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार/ निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे.

# जामशेत येथे 'वित्तीय साक्षरता सप्ताह' यशस्वीपणे संपन्न; सुरक्षित व जबाबदार बँकिंगचा संदेश

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१०, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील जामशेत येथे दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, पालघर, महाराष्ट्र ग्रामीण बँक (MGB) डहाणू शाखा तसेच आर्थिक साक्षरता सल्ला केंद्र, पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने 'वित्तीय साक्षरता सप्ताह' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक (LDM) विशाल वाघ होते.



या कार्यक्रमास महाराष्ट्र ग्रामीण बँक डहाणू शाखेचे व्यवस्थापक, आर्थिक साक्षरता सल्लागार, स्वयंसहायता गट (SHG) सदस्य मोठ्या संख्येने तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमात चत्रह्ब डहाणू शाखेचे व्यवस्थापक संजय कळंबे यांनी KYC d Re-KYC (RKYC) अद्ययावत ठेवण्याचे महत्त्व स्पष्ट केले. RKYC पूर्ण न केल्यास बँक खात्यांवर येणाऱ्या मर्यादा, व्यवहारांवरील अडथळे याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

यावेळी आर्थिक साक्षरता सल्लागार उज्ज्वला कोकणे यांनी उपस्थितांना वित्तीय साक्षरतेचे महत्त्व, विविध सामाजिक सुरक्षा योजना, सुरक्षित डिजिटल व्यवहार, 'मनी म्युल अकाउंट' म्हणजे काय, अशा खात्यांचा गैरवापर कसा होतो तसेच त्यामध्ये सहभागी झाल्यास होणारे कायदेशीर व आर्थिक परिणाम याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

प्रमुख अतिथी म्हणून बोलताना जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विशाल वाघ यांनी नागरिकांना आपले बँक खाते, एटीएम कार्ड, पिन कोड व ओटीपी कुणालाही सांगू नये, असे आवाहन केले.

तसेच बँकिंग साक्षरता, कर्ज सुविधा, विमा योजना, सामाजिक सुरक्षा योजना, सायबर फसवणूक प्रतिबंध आणि महिलांसाठी उपलब्ध विविध आर्थिक योजनांची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

कार्यक्रमात बोलताना विशाल वाघ यांनी आर्थिक साक्षरता, RKYC आणि मनी म्युल अकाउंटविषयी जनजागृती ही आजच्या काळाची गरज असल्याचे नमूद केले. विशेषतः स्वयंसहायता गट सदस्यांनी सुरक्षित व जबाबदार बँकिंग व्यवहार करावेत, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम व समावेशक समाजनिर्मितीस मोठी मदत होईल, असे मत सरपंच विकास दौडा यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला उपस्थित नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

# ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धेच्या युगात सक्षमपणे उभे राहावेत - मंगेश दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या विशेष प्रयत्नातून जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाच्या सेस फंडातून जवळे येथील श्री. धर्मनाथ विद्यालयातील १० विद्यार्थ्यांना सायकल वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास आमदार दाते यांचे चिरंजीव, मंगेश दाते हे प्रमुख उपस्थित होते.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सोयी उपलब्ध व्हाव्यात, शाळेत ये-जा करणे सुलभ व्हावे आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक गतीमान व्हावा, या उद्देशाने ही सायकल वाटप योजना राबविण्यात येत असल्याचे दाते यांनी यावेळी स्पष्ट केले. या कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किसनराव रासकर, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग सल्लागार समन्वयक संदीपराव सालके, संभाजी काका सोमवंशी, प्रदिप सोमवंशी, संतोष सालके, मंगेश सालके, कैलास शेळके, संपतराव सालके, गोपाळे काका, सोनालीताई ढवळे, महेंद्र पठारे आदी मान्यवर उपस्थित होते.

> कोणत्याही क्षेत्रातील प्रगती ही सामूहिक प्रयत्नांवर अवलंबून असते. आमदार काशिनाथ दाते सरांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून विकासकामे राबविण्याचा संकल्प आपण सर्वांनी करावा. या उपक्रमामुळे लाभार्थी विद्यार्थी व पालकांमध्ये समाधान व्यक्त होत असून आमदार दाते सरांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.
> **- मंगेश दाते (उद्योजक, पारनेर)**

यावेळी बोलताना मंगेश दाते म्हणाले की, आमदार काशिनाथ दाते हे सातत्याने समाजातील विविध घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील असून जवळे गावच्या विकासासाठी त्यांनी नेहमीच झुकते माप दिले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धेच्या युगात सक्षमपणे उभे राहावेत, यासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यावर आमदार दाते यांचा नेहमीच भर राहिला आहे. यावर्षी धर्मनाथ विद्यालयातील मागणी अर्जच मर्यादित होते. त्यामुळे कमी विद्यार्थ्यांना सायकल अनुदानाचा लाभ मिळाला असला, तरी पुढील वर्षी अधिकाधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

# सुपा येथे शिवबाबांचे ९० वा अवतरण सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१०, सुपा (अहिल्यानगर) :** राजयोगाच्या नियमित अभ्यासाने मानवी जीवनात सकारात्मक बदल घडतात. यामुळे केवळ वैयक्तिक जीवनच नाही, तर जगाकडे बघण्याचा संपूर्ण दृष्टिकोनच बदलून जातो आणि जीवनात शांती व आनंद निर्माण होतो, असे प्रतिपादन ब्रह्मकुमारी साधना दिदी यांनी केले.



सुपा येथील ब्रह्मकुमारी गीता पाठशाळेत आयोजित महाशिवरात्री उत्सव आणि शिवबाबाचे ९० वे अवतरण सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. हा सोहळा अत्यंत मंगलमय आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात पहाटे पारनेर सेंटरच्या संचालिका साधना दिदी यांच्या हस्ते 'मुरली' कथनाने झाली.

यानंतर, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवध्वजाचे विधिवत पूजन करण्यात आले आणि त्यानंतर ध्वजारोहण सोहळा पार पडला. यावेळी वातावरणात शिवभक्तीचा जल्लोष पाहायला मिळाला. गीतेंच्या वचनानुसार जेव्हा जेव्हा मनुष्य धर्म भ्रष्ट व कर्म भ्रष्ट बनतो अशा वेळी स्वयं परम पिता शिव निराकार या भारत भूमीवर अवतरित होतात.

या समयाचे यादगार म्हणूनच आपण सर्व दरवर्षी महाशिवरात्र साजरी करतो म्हणजे शिव भगवान या भारत भूमीवर अवतरित होऊन आज ९० वर्ष पूर्ण होत आहेत. परंतु आपण महाशिवरात्री दिवशी उपवास का करतो?पांढरी साडीच का घालतात?कडू धोतर्याचे फुलच का वाहतात?त्रिकुंड का ओढतात? पिंडीवर अभिषेक का करतात? अखंड नारळच का वाहिला जातो? तीन पानांचे बेलपत्र का वाहिले जाते? शिव निराकार भारत भूमीवर कधी अवतरित होतात? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे ऐकायला जरुर एकदा ब्रह्माकुमारी विद्यालयाला भेट द्या, प्रवेश विनामूल्य आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन विद्यालयाच्या वतीने करण्यात आले. उपस्थित सर्वांना महाप्रसादाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या सोहळ्यामुळे सुपा परिसरात आध्यात्मिक चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रसंगी सुपा ग्रामपंचायतीचे उपसरपंच सागर मैड, देवराम भाई ढोले, प्रतिमा माताजी, सुमन ढोले, दिलीप थोरे, लक्ष्मण गवळी, मीना मेमाणे, राम दास भाई, राम भाई,पार्वती माता, सुषमा माता, कदम भाई, मोकाते भाई यांच्यासह परिसरातील अनेक ब्रह्मकुमारी अनुयायी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उद्योजक स्वामी पाटील यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, कल्याण :**

दावडी गावातील उद्योजक तथा कल्याण - डोंबिवली महापालिकेचे नगरसेवक जालिंदर पाटील याचे थोरले बंधू सोमनाथ उर्फ स्वामी पाटील यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुर्दैवी निधन झाले आहे. दिनांक ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी सोमनाथ उर्फ स्वामी पाटील हे ४०+ वयोगटातील क्रिकेट सामने खेळण्यासाठी खोणी येथिल क्रिकेट टूर्नामेंट मध्ये सहभागी झाले होते. क्रिकेट खेळून घरी जाण्यासाठी आपली कार चालू करत असताना अचानक त्यांच्या छातीत कळ येऊन ते जागीच मूर्च्छित झाले. लागलीच त्यांना जवळच असणाऱ्या खोणी येथील रुग्णालयात तपासणीसाठी दाखल करण्यात आहे. परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृत्यू समयी त्यांचे वय ५२ वर्षे होते. त्यांच्या अकाली जाण्याने पाटील कटुंबीय व ग्रामस्थांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सोमनाथ पाटील यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, ६ भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे.

# हडस्ती येथे जगन्नाथबाबा पालखी मिरवणुकीत भाविकांची मांदियाळी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यात शेवटच्या टोकावर व वर्धा नदीच्या तिरावर हडस्ती गाव आहे. गावाची लोकसंख्या जेमतेम सातशेवर आहे. मात्र या गावाला श्री सद्‌गुरू जगन्नाथबाबा देवस्थान दरवर्षी भाविकांना भक्तीमय वातावरणाची भेट देत आहे. यावर्षी श्री सद्‌गुरू जगन्नाथबाबा मूर्ती स्थापना दिवस व मारोती महाराज जन्मोत्सव दि.०८ व दिनांक ०९ फेब्रुवारी २०२६ ला साजरा केला. यामध्ये पालखी मिरवणुकीत पंचक्रोशीतील तब्बल ४० भजन मंडळींनी सहभाग घेत भक्तीमय वातावरणाची अनुभूती दिली. हजारोंवर भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेत सामाजिक एकतेचा संदेश दिला. यानिमित्त हडस्ती जगन्नाथबाबा पालखी मिरवणुकीत भाविकांची मांदियाळी दिसून आली. विशेष म्हणजे, मॉ. कामाक्षी म्युझिकच्या भक्तीरसातील गीतगायनाने भाविकांना भक्तीमध्ये तल्लीन केले.



बल्लारपूर तालुक्यातील हडस्ती येथे श्री सद्‌गुरू जगन्नाथबाबा देवस्थान समितीच्या वतीने जगन्नाथबाबा मूर्ती स्थापना दिन व मारोती महाराज जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. सलग दोन दिवस चालणाऱ्या सोहळ्यामुळे अवघ्या पंचक्रोशीत भक्तीमय वातावरण निर्माण होते. पहिल्या दिवशी गावातील आबालवृद्ध एकोप्याने गावाची स्वच्छतेचे दर्शन घडवते. यामध्ये तरूणांचा सहभाग मोठा असतो.

यानिमित्त विधायक कार्याची अनुभूती मिळते. घटस्थापना झाल्यावर कीर्तनातून प्रबोधन करण्याची परंपरा गावकरी जोपासत आहे. दुसऱ्या दिवशी पहाटे मारोती महाराज यांच्याहस्ते सदगुरू जगन्नाथबाबा मूर्ती समोर पुजाअर्चना करून मंगलमय भावना व्यक्त केली जाते. पंचक्रोशीतील भजन मंडळाचा सहभाग, सजवलेल्या बैलगाडीतून पालखी मिरवणूक डोळ्याचे पारणे फेडते.घरांच्या दारासमोर रांगोळी भाविकांचे आदरातिथ्य करते. यामुळे सद्गुरु जगन्नाथबाबा देवस्थान परिसरात जत्रेचे स्वरूप प्राप्त होते.

दहीहंडी कार्यक्रमाच्या नंतर पंचक्रोशीतील भाविकांनी पंगत बसवून महाप्रसाद वितरण करण्याचा प्रसंग 'अतिथी देवो भव' याची प्रचिती देणारा ठरला आहे. किर्तनकार ह.भ.प.शरद महाराज वैद्य, खेमराज महाराज कायर (पिपरी), मोरेश्वर महाराज आणि ज्यांच्या नावाने जन्मोत्सव सोहळा साजरा केला जातो, असे मारोती महाराज यांचे आदरातिथ्य भाविकांकडून केले जाते. सामाजिक सौहार्दाच्या सोहळ्याला भाविकांची अलोट गर्दी पालखी सोहळ्याचे वैशिष्ट्ये ठरत आहे. या सोहळ्याला सदगुरू जगन्नाथबाबा देवस्थान समितीच्या पदाधिकाऱ्यांचे व मत तथा मन भेद विसरून केलेल्या परिश्रमाचे कार्य कौतुकास्पद व प्रेरणा देणारे ठरत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचे जागतिक वारसा प्रमाणपत्र स्वीकारण्याकरिता मंत्री शेलार फ्रान्सला

## युनेस्को मुख्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना करणार अभिवादन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, मुंबई :** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र स्वीकारण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार हे आज रात्री शिष्टमंडळासह फ्रान्स दौऱ्यावर जाणार आहेत.

११ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ते पॅरिस येथे होणाऱ्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमांमध्ये सहभागी होतील. युनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याला एका विशेष कार्यक्रमात ते अभिवादन करणार आहेत. सुमारे



दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी ११ जुलै २०२५ रोजी, युनेस्कोच्या ४७ व्या अधिवेशनात, 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया'या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र मंत्री ॲड.शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ पॅरिस येथे स्वीकारणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणाशी लढून उभारलेल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण, सुरक्षित शासनव्यवस्था आणि लोककल्याण, यासाठी साकारलेली गड-किल्ल्यांची साखळी हा भारतीय इतिहासातील अद्वितीय लष्करी व राज्यकारभाराचा नमुना मानला जातो. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा १२ किल्ल्यांचा समूह जागतिक वारसा स्थळ म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे.

या फेब्रुवारी २०२५ मध्ये ॲड.शेलार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यीय प्रतिनिधीमंडळ पॅरिसमध्ये युनेस्कोसमोर तांत्रिक आणि धोरणात्मक मांडणी करून या मानांकनासाठी सादरीकरण आणि युक्तीवाद करून आले होते. आता प्रत्यक्ष मानांकन-पत्र स्वीकारण्याच्या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याच्या या दौऱ्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या वारशाचा जागतिक सन्मान असा गौरवशाली आयाम लाभत आहे.

या दौऱ्यात मंत्री ॲड. शेलार हे युनेस्कोचे महासंचालक,संबंधित तज्ज्ञ व भारताचे युनेस्कोमधील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांच्यासमवेत स्वतंत्र बैठकींमध्ये सहभागी होऊन महाराष्ट्रातील इतर प्रस्तावित वारसास्थळांबाबत सविस्तर चर्चा करणार आहेत. कोकणातील कातळशिल्प, महाराष्ट्रातील सागरी किल्ले तसेच अमूर्त सांस्कृतिक वारशांतर्गत पंढरपूर वारी, गणेशोत्सव व दहीहंडी यांना जागतिक वारसा म्हणून मान्यता मिळविण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या प्रयत्नांना या भेटीत नवे बळ मिळेल, असा विश्वास मंत्री ॲड.शेलार यांनी व्यक्त केला आहे. यासोबतच वांद्रे, मुंबई येथे उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या 'महाराष्ट्र वस्तुसंग्रहालया'साठी पॅरिसमधील नामांकित संग्रहालये, त्यांचे व्यवस्थापन, प्रदर्शनरचना, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी बाबींचा अभ्यास करून त्या धर्तीवर येथील संग्रहालय अधिक समृद्ध करण्यासाठी हे शिष्टमंडळ या दौऱ्यात पाहणी व अभ्यास करणार आहे.

भारताच्या संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा युनेस्को मुख्यालयाला भेट दिला असून, २६नोव्हेंबर२०२५रोजी संविधान दिनानिमित्त या पुतळ्याची स्थापना पॅरिसमध्ये युनेस्को मुख्यालयात झाली आहे. सामाजिक न्याय,समानता, बंधुता आणि शिक्षणाद्वारे सक्षमीकरण यांची भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली शिकवण ही युनेस्कोच्या मुलभूत ध्येयाशी सुसंगत आहे

. पॅरीसमधील त्यांच्या या स्मारकाच्या विशेष कार्यक्रम व मानवंदना सोहळ्यात मंत्री ॲड. शेलार अभिवादन करणार आहेत. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना पॅरिसमध्ये केलेले हे अभिवादन भारतीय लोकशाहीच्या मूल्यांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नव्याने अधोरेखित करणारे पाऊल आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. या दौऱ्यामुळे राज्याचा सांस्कृतिक वारसा,पर्यटनक्षमता आणि जागतिक पातळीवरील प्रतिमा अधिक भक्कम होणार आहे.


# देवगाव येथे १८ वर्षीय युवकाची आत्महत्या

## गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१०, विंचूर (नाशिक) :** देवगाव ता.निफाड येथील एका १८ वर्षीय युवकाने राहत्या घरात छतावरील पंख्याला साडीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना घडली असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिस पाटील सुनिल बोचरे यांनी समक्ष खबर दिली की, यातील यातील इसम राकेश गोरख पवार वय १८ वर्ष रा.इंदिरानगर देवगाव याने दि.०९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजेच्या सुमारास राहते घरात छतावरील फॅनला साडीचे साहाय्याने गळफास घेतला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक मोहन पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन त्यास ग्रामीण रुग्णालय लासलगाव येथे उपचाराकामी दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास तपासुन मयत घोषित केले. सदर घटनेची लासलगाव पोलिस ठाण्यात अ.मृ रजि नंबर ११/२०२६ भा.न्या.संहिता कायदा २०२३ चे




कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो. हवा.औदुंबर मुरडनर अधिक तपास करीत आहेत.

# भिवंडीत बुलेट ट्रेन भूसंपादनात १९३ कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप; खा. म्हात्रे स्वतः न्यायालयात हजर

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१०, शहापूर, (ठाणे) :** मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील भूसंपादन प्रक्रियेवरून भिवंडीत राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या कुटुंबीयांवर भूसंपादनातील गैरव्यवहाराचे आरोप केले असून या संदर्भातील दाव्याच्या सुनावणीसाठी ते मंगळवारी भिवंडी न्यायालयात हजर होते.

पत्रकारांशी संवाद साधताना खा.म्हात्रे यांनी मौजे दिवेअंजूर येथील सर्व्हे क्रमांक २८ मधील जमीन बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी बाधित असल्याचे दर्शवून शासनाकडून २० कोटी १३ लाख रुपयांचा मोबदला घेतल्याचा



आरोप केला. तसेच जून २०२४ मध्ये याच जमिनीच्या फेरमूल्यांकनाद्वारे सुमारे १९३ कोटी रुपयांच्या मोबदल्याची शिफारस झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. खा. म्हात्रे यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित विकास करारनामा २०१२ मध्ये नोंदवलेला दाखवला असला तरी त्यासाठी वापरलेला स्टॅम्प पेपर २०१६ सालचा असून करारनाम्यावरचा फोटो २०१८ मधील असल्याचा आरोप आहे.

या संदर्भातील कागदपत्रे शासन व पोलीस प्रशासनाकडे सादर केली असून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५६(३) अन्वये न्यायालयात अर्ज दाखल केल्याची माहिती त्यांनी दिली. पुढील सुनावणी २७ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील किंवा त्यांच्या कुटुंबीयांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप प्राप्त झालेली नाही. संबंधितांकडून स्पष्टीकरण मिळाल्यानंतर त्याला ही प्रसिद्धी दिली जाईल.

बुलेट ट्रेन प्रकल्प हा केंद्र शासनाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम असून भूसंपादन प्रक्रियेत पारदर्शकता आणि कायदेशीरतेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. आता न्यायालयीन प्रक्रियेतून पुढील बाबी स्पष्ट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्या ११ आरोपींविरुद्ध गुन्हा



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१०, संगमनेर (अहिल्यानगर) :** दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी संगमनेर शहरातील मोगलपुरा परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेने पुन्हा मोठी कारवाई करत ११ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून एकूण ११,०६,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अहिल्यानगर सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर कत्तल व गोमांस विक्री करणाऱ्यांविरुद्ध माहिती संकलित करून कठोर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, विजय पवार, दीपक घाटकर, सुयोग सुपेकर, अमृत आढाव व चालक महादेव भांड यांचे पथक तयार करण्यात आले.दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे गुप्त बातमीदारामार्फत राजवाडा, बुद्धविहार समोर, मोगलपुरा परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने तत्काळ छापा टाकला.

यावेळी काही इसम कत्तल केलेले गोमांस टेम्पोमध्ये भरताना आढळले. पोलिसांची चाहूल लागताच काही जण पत्र्याच्या शेडच्या मागील दरवाजातून पळून गेले, तर काही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये फैज अशपाक कुरेशी (वय २२), सद्दम मोहम्मद जावेद कुरेशी (वय २९), कलिम सलीम सय्यद (वय ३६), मुलमफरिद जावेद कुरेशी (वय ३२), अनस गुलामसरवर कुरेशी (वय २१), फैसल जाकिर कुरेशी (वय २०) व जुनेद आयाज कुरेशी (सर्व रा. संगमनेर) यांचा समावेश आहे.

तर अतिक उर्फ सोनू रफिक कुरेशी, सलिम रियाज कुरेशी, हाशमी उर्फ बुड्डी नासिर कुरेशी व टाटा टेम्पोचा मालक हे फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. कारवाईदरम्यान पोलिसांनी ५,४०,००० रुपये किमतीचे सुमारे १८०० किलो गोमांस, ५,५०,००० रुपये किमतीचा टाटा कंपनीचा टेम्पो, १२,००० रुपये किमतीची रिक्षा, १,००० रुपये किमतीचा इलेक्ट्रिक वजनकाटा तसेच ३,००० रुपये किमतीची लोखंडी कुऱ्हाड, दोन चाकू व काणस असा एकूण ११,०६,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १३६/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, ३२५, ३(५) तसेच महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९९५ (सुधारित २०१५) चे कलम ५(ब), ५(क), ९, ९(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करीत आहेत. सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे.

# विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी ध्वनीप्रदूषण टाळा; नियम मोडल्यास होणार थेट गुन्हे दाखल!

## लासलगाव पोलीस प्रशासनाचे नागरिकांना कडक आवाहन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१०, लासलगाव (नाशिक) :** सध्या इयत्ता १० वी आणि १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षा जवळ आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे भवितव्य या परीक्षांवर अवलंबून असल्याने ते रात्रंदिवस अभ्यासात मग्न आहेत.

मात्र, लग्न सोहळे आणि धार्मिक कार्यक्रमांमधील मोठ्या आवाजाच्या डीजे (DJ) व लाऊडस्पीकरमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर लासलगाव पोलिसांनी ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांविरुद्ध कडक पाऊले उचलण्याचे संकेत दिले आहेत.

**कारवाईचा बडगा**

लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांनी स्पष्ट केले आहे की, रात्री १० वाजेनंतर आवाज आढळल्यास संबंधित आयोजकांवर कारवाई केली जाईल.नियम मोडणाऱ्या डीजे (ृग) मालकांवर दंडात्मक कारवाई करून थेट गुन्हा नोंदवण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियमांचे पालन करणे सर्वांसाठी बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि सार्वजनिक शांततेसाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांची गय केली जाणार नाही.

**- भास्करराव शिंदे**
**(सहा.पोलीस निरीक्षक, लासलगाव)**

रात्री १० नंतर शांतता पाळा शासकीय नियमानुसार, रात्री १० वाजेनंतर कोणत्याही प्रकारचे लाऊडस्पीकर किंवा मोठ्या आवाजातील संगीत वाजवणे कायद्याने प्रतिबंधित आहे. तरीही काही ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निर्दर्शनास आले आहे. याचा फटका केवळ विद्यार्थ्यांनाच नाही, तर वृद्ध नागरिक, आजारी व्यक्ती आणि लहान मुलांनाही बसत आहे.

# हेल्मेट सक्तीबाबत राहुरी पोलिसांची मोहीम; रॉंग साईड व रंगीत काचा असलेल्या वाहनांवर कारवाई

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१०, राहुरी (अहिल्यानगर) :** प्राणांतिक अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत उद्या दि. १० फेब्रुवारी २०२६ पासून हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीस्वारांवर नियमित कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती राहुरी पोलिसांनी दिली आहे. अपर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश यांच्या सूचनेनुसार तसेच मा. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या निर्देशानुसार ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत सन २०२४ मध्ये ५७ तर सन २०२५ मध्ये ५८ प्राणांतिक अपघात झाले असून तेवढ्याच निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या अपघातांमध्ये बहुतांश मृत्यू हे दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर न केल्यामुळे झाल्याचे पोलिसांच्या निर्दर्शनास आले आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने हेल्मेटविना प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांनी नगर - मनमाड महामार्गावर तसेच शहर परिसरात प्रवास करताना हेल्मेटचा वापर करून स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, सध्या अहिल्यानगर ते मनमाड महामार्गाचे काम सुरू असल्याने राहुरी शहरात एकेरी वाहतूक सुरू आहे. वाहतूक मंद गतीने सुरू असताना काही वाहनचालक रॉंग साईडने वाहने चालवून वाहतूक कोंडी निर्माण करत असल्याने दि.०९ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष कारवाई करण्यात आली. रॉंग साईडने वाहन चालवणाऱ्या ४० वाहनांवर कारवाई करून एकूण ३० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच रंगीत व ब्लॅक काचा असलेल्या ४ वाहनांवर कारवाई करून २ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. नागरिकांनी आपली वाहने एकेरी मार्गातच चालवावीत, रॉंग साईडने वाहन चालवू नये तसेच वाहनांवरील रंगीत व ब्लॅक काचा काढून घ्याव्यात, अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, असे राहुरी पोलीस स्टेशनच्या वाहतूक विभागामार्फत सांगण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर (श्रीरामपूर विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, सहाय्यक फौजदार भाऊसाहेब आव्हाड तसेच पोलीस हवालदार संतोष ठोंबरे, रमेश दरेकर आणि बापू फुलमाळी यांनी केली.

# ग्रामपंचायतींवरील 'प्रशासक राज' ला स्थगिती; नागपूर खंडपीठाचा निर्णय

अक्षराज : वसंत रांधवण

दि.१०, अहिल्यानगर : राज्यातील ग्रामपंचायतींवर थेट प्रशासक नियुक्त करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जोरदार चपराक दिली आहे. सरकारने २३ जानेवारी २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाच्या अंमलबजावणीला न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली असून, पुढील सुनावणीपर्यंत या संदर्भात कोणतीही कारवाई करू नये, असे स्पष्ट निर्देश राज्य सरकारला दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सरपंच परिषदेचे राज्य उपाध्यक्ष अरविंद दामोदर दळवी व स्वराज्य सरपंच सेवा संघाचे नेते बाबासाहेब पावसे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यासंदर्भात रिट याचिका क्र. १२५०/२०२६ दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती अनिल एस. किलोर आणि न्यायमूर्ती राज डी. वाकोडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. राज्यातील अनेक ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्यानंतर, रीतसर निवडणुका न घेता थेट प्रशासक नियुक्त करण्याचा मार्ग शासन अवलंबत असल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला होता. हे पाऊल लोकशाही मूल्यांना बाधा आणणारे आणि कायदेशीर चौकटीच्या बाहेर असल्याचे गांभीर्याने न्यायालयासमोर मांडण्यात आले.

सुनावणी दरम्यान, न्यायालयाने शासनाच्या २३ जानेवारीच्या परिपत्रकाचे बारकाईने निरीक्षण केले. सदर परिपत्रकातील कारणे ही चुकीच्या आधारावर असल्याचे प्रथमदर्शनी न्यायालयाच्या निदर्शनास आले. खंडपीठाने नमूद केले की, प्रशासक नियुक्तीबाबतची शासनाची भूमिका कायदेशीरदृष्ट्या टिकणारी वाटत नाही. परिणामी, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार या संपूर्ण प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. यामुळे ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याच्या सरकारच्या हालचालींना आता ब्रेक लागला आहे. या प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. स्वप्निल कारंजकर आणि ॲड. सिध्दांत घट्टे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. ग्रामपंचायतीचा कारभार हा निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या हाती असावा,ही लोकशाहीतील मूलभूत संकल्पना या याचिकेच्या केंद्रस्थानी आहे. न्यायालयाने दिलेल्या या अंतरिम दिलासामुळे सरपंच परिषद आणि ग्रामीण भागातील स्थानिक प्रतिनिधींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार असून, न्यायालय अंतिम निर्णय काय देते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात बातम्या

# तुर्भे विभाग अंतर्गत अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई



**अक्षराज : जे.के.पोळ**


**दि.१०, नवी मुंबई :** महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभाग अंतर्गत धनपाल गोकुळ पाटील व श्रीम. मालती धनपाल पाटील, घर क्र. ५१८, सेक्टर - ५, सानपाडागांव, सानपाडा, नवी मुंबई, यांनी वरील नमुद पत्यावर प्रत्यक्ष ठिकाणी स्थळपाहणी केली असता विनापरवानगी अनधिकृतरित्या ९.४० मी. ु ५.० मी. मोजमापाच्या क्षेत्रफळामध्ये चौथ्या मजल्याचे (G+4) आरसीसी स्वरुपाचे बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली होती. परंतु, सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरुच होते. त्याअनुषंगाने, अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाईच्या मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत कारवाई करुन सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेलेआहे.सदर मोहिम आयुक्त यांचे आदेशान्वये अति. आयुक्त राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड, यांचे मार्गदर्शनाखाली व सहाय्यक आयुक्त, तुर्भे सागर मोरे, यांचे नियंत्रणाखाली तुर्भे विभागातील विनोद आंब्रे, कनिष्ठ अभियंता व इतर अधिकारी/ कर्मचारी यांचे उपस्थिती मध्ये करण्यात आली आहे. तसेच सदर मोहिमेसाठी अतिक्रमण निर्मुलन पथकातील पोलीस अधिकारी/ अंमलदार आणि अतिक्रमण विभागातील सुरक्षारक्षक देखील तैनात ठेवण्यात आले होते.

वरील अनधिकृत बांधकाम हटविण्याकरीता इलेक्ट्रीक हॅमर व मजूर यांचा वापर करण्यात आलाआहे. तसेच यापुढे देखील अशा प्रकारे अनधिकृत बांधकामावर कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

# 'हिंद दी चादर' शहिदी समागमासाठी प्रशासन सज्ज

## वाहतूक, पार्किंग व रेल्वे व्यवस्थेचे सूक्ष्म नियोजन



**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.१०, नवी मुंबई :** 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर' यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त दि.२८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी खारघर, सेक्टर २९ येथील ओवे मैदानावर आयोजित भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक, पार्किंग आणि नागरिकांच्या सोयीसुविधांचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. कार्यक्रमस्थळी येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्ती तसेच सामान्य नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात आज आढावा बैठक घेण्यात आली.या बैठकीस पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम, सह आयुक्त (करमणूक) रविंद्र पवार, उपजिल्हाधिकारी रविंद्र राठोड, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अंशुमन श्रीवास्तव व रविंद्र इंगोले, प्र. माहिती उपसंचालक मनोज सानप, जेएनपीएचे वाहतूक अधिकारी यशवंत पाटील व नागेश आकोडे, तसेच तहसीलदार (सामान्य प्रशासन) गजानन धुमाळ आदी उपस्थित होते.नागपूर व नांदेड येथे शिस्तबद्ध व शांततेत पार पडलेल्या या समागमानंतर खारघर येथे होणाऱ्या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून लाखोंच्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याबरोबरच एआय तंत्रज्ञानाचा वापर करून वाहतूक नियंत्रण करण्याच्या सूचना आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिल्या. नाशिक, पुणे व मुंबईकडून जेएनपीएकडे जाणाऱ्या तसेच जेएनपीएकडून विविध ठिकाणी जाणाऱ्या कंटेनर वाहतुकीचे विशेष नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. कार्यक्रमस्थळी येणाऱ्या बसेससाठी स्वतंत्र मार्गिका निश्चित करणे, पुरेशी पार्किंग व्यवस्था करणे आणि आवश्यकतेनुसार पर्यायी मार्ग उपलब्ध ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक रेल्वेने येण्याची शक्यता लक्षात घेता, दि.२८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी पश्चिम, मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गावर मेगाब्लॉक ठेवू नये, यासाठी रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार करण्याचे निर्देश ही आयुक्तांनी दिले.

# पानसरे महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संपन्न



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१०, कुंडलवाडी (नांदेड) :** अर्जापूर येथील पानसरे महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रम संपन्न झाला. उदघाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे .प्राचार्य डॉ. महादेव बेलखेडे, उदघाटक व प्रमुख पाहुणे मोहन गंगोने,संस्थेचे संचालक प्रकाश अर्जुने, उपप्राचार्य डॉ.गोविंद चौधरी,कार्यालयीन अधीक्षक राजेश्वर लापशेटवार, स्टाफ सेक्रेटरी प्रा.हनमंत मटके, मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सिद्धोधन कांबळे, मराठी विभागातील प्रा.डॉ.नारायण शिवशेट्टे, डॉ.गोपाळ चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ सिद्धोधन कांबळे यांनी केले आहे. तर कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा विनोदी हास्य कलावंत मोहन गंगोने हे उपस्थित होते. त्यांच्या बहारदार शैलीत 'कॉलेजला आग लागली .....' हे विनोदी प्रसंग त्यानी सादर केले. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा व रांगोळी इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. आयोजित सर्व स्पर्धा संपन्न झाल्यानंतर पारितोषिक व प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे स्टाफ सेक्रेटरी प्रा.हनमंत मटके, उपप्राचार्य डॉ.गोविंद चौधरी, मराठी विभाग प्रमुख डॉ.सिद्धोधन कांबळे उपस्थित होते. त्यांच्या शुभ हस्ते विविध स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले.